महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/१८८ दिनांक : ३० जुले,२०२०

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.....

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांचे पत्र क्रमांक रासाप्रपक/प्र प्र शै वर्ष २०२०-२१ माहिती/५६१/२०२०, दिनांक ६ जुलै २०२०

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांसाठी आपल्या संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून/परीक्षा मंडळाकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक **०५.०८.२०२० पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांना http://dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाइन प्रणाली दिनांक ३१.०७.२०२० पासून उपलब्ध करुन देण्यात येत असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असेल.

सदर विषयाबाबत संस्थेकडून करावयाच्या कार्यवाही संबंधीच्या विस्तृत सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रतिलिपी
१. आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर यांना माहितीसाठी

# Instructions

( क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/७८ दिनांक :३० जुलै २०२० )

All institutes which are conducting Undergraduate and Post Graduate technical professional courses and Diploma Courses are hereby informed to check the correctness of already filled data or update their institute information related with courses approved for academic year 2020-21 by AICTE/PCI/CoA (as applicable) through their Institute Login immediately.

All Institutes shall exercise the check/update activity with utmost care, as the same data shall be processed for the allotment / admissions. The institute shall be responsible for incorrect allotment if the data checked/updated by the institutes is found not in conformity with the approvals given by the appropriate authorities.

**The Institutes shall be able to update the following information for academic year 2020-21 as given below:**

1. Previous Academic Year (2019-20) Intake as per GR - only for View
2. Intake as per the approval letter from AICTE/PCI/CoA
3. Intake as per the Government Resolution (GR)
4. Intake as per University/Board affiliation,
5. Intake & Remark as per the Hon. Court directives (if any) - only for View - This will be updated by DTE from time to time.
6. NRI, PIO Approval as per Apex Body
7. Status for Accreditation of Institution / Course (NBA/NAAC),
8. Upload Approval / Affiliation Letters/ GR/ Court Order/Accreditation
9. Update Seat Surrender (if any)
10. Verify Institute Profile along with Seat Surrender

**Note: The Final Intake for Admission for academic year 2020-21 shall be calculated automatically by the system based on the above inputs and the Seat Distributions shall be displayed by considering the institution status and Seat Surrender, if any.**

## A. *Instructions for Institutes*

1. Visit http://dtemaharashtra.gov.in/
2. Login with Institute Code and Password (which you are using for logging in DTE Portal). The new approved institutions shall contact DTE Officer for DTE Code.
3. View, Check, Update and Confirm the data by 05 August 2020 upto 5 p.m.
4. The institution shall not be able to edit details once confirmed.
5. The System shall generate the Institute profile for following courses:
   a. UG/PG Courses
   b. Diploma Courses
6. Upload Scanned Copy of Institute Profiles [for UG/PG & Diploma separately] duly signed with seal through Institute Login.
7. RO shall verify the uploaded signed and sealed Institute Profile copy & approve the same and shall issue acknowledgement. [ RO can Edit /Add Course ]